कै.भाई नेरुरकर चषक खो-खो क्रीडा स्पर्धेच्या
<u>प्रचलित नियमावलीमध्ये सुधारणा करण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : क्रीस्पर्धा-१००९/(प्र.क्र.६६/०९)/क्रीयुसे-२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ७ फेब्रुवारी,२०१३.

वाचा :- (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-क्रीस्पर्धा-१००८/ प्र.क्र.२२/०८/क्रीयुसे-२, दिनांक २३ सप्टेंबर,२००८,
(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-क्रीस्पर्धा-१००९/ प्र.क्र.६६/०९/क्रीयुसे-२, दिनांक ६ ऑगस्ट,२००९,
(३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-क्रीस्पर्धा-२०११/ प्र.क्र.४५/११/क्रीयुसे-२, दिनांक ३ जानेवारी,२०१२.

प्रस्तावना :- राज्यातील खो खो खेळाच्या खेळाडूंना राज्य स्पर्धेत खेळण्याची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी तसेच त्यांना व क्रीडाप्रेमी प्रेक्षकांना दर्जेदार खेळाडूंचे कौशल्य व खेळ पाहण्यास मिळावा यासाठी राज्यस्तरावर १९ वर्षाखालील मुले व मुलींसाठी प्रतिवर्षी एकलव्य राज्यस्तर खो-खो क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा निर्णय उपरोक्त दिनांक २३ सप्टेंबर,२००८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला असून सदर स्पर्धा **"एकलव्य राज्यस्तर खो-खो क्रीडा स्पर्धा"** याऐवजी **"कै.भाई नेरुरकर चषक खो-खो क्रीडा स्पर्धा"** या नावाने आयोजित करण्यास तसेच सदर स्पर्धेच्या नियमावलीस उपरोक्त दिनांक ६ ऑगस्ट,२००९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच स्पर्धा आयोजनासंबंधातील विविध बाबींच्या वाढलेल्या खर्चामुळे सदर स्पर्धेच्या प्रतिवर्ष रु.१८.०० लाख एवढ्या अनुदानामध्ये वाढ करुन ते प्रतिवर्ष रु.५०.०० लाख एवढे करण्यास उपरोक्त दिनांक ३ जानेवारी,२०१२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त दिनांक ६ ऑगस्ट,२००९ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या प्रचलित नियमावलीमध्ये काही सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती व त्याबाबत आता शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**: शा स न नि र्ण य :** कै.भाई नेरुरकर चषक खो-खो क्रीडा स्पर्धेच्या उपरोक्त दिनांक ६ ऑगस्ट,२००९ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या प्रचलित नियमावलीमध्ये सुधारणा करुन सोबतच्या परिशिष्ट-"अ" मधील सुधारित नियमावलीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

तसेच कै.भाई नेरुरकर चषक खो-खो क्रीडा स्पर्धेसाठी सोबतच्या परिशिष्ट-"ब" अनुसार बाबनिहाय खर्चास आणि परिशिष्ट-"क" अनुसार विविध समित्या गठीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. या स्पर्धेसाठी होणारा खर्च मुख्य लेखाशीर्ष "२२०४-क्रीडा व युवकसेवा-१०४-क्रीडा व खेळ-योजनांतर्गत योजना-(०९)(११)-कै.भाई नेरुरकर चषक खो-खो स्पर्धा-३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेतर), संगणक क्रमांक-(२२०४ ५४१ २)" याखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याअंतर्गत त्या त्या वर्षी केलेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय सन २०१२-१३ या वर्षापासून आयोजित केल्या जाणा-या स्पर्धांसाठी लागू होईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर **(www.maharashtra. gov.in)** उपलब्ध करण्यात आला असून त्याचा **संगणक सांकेतांक क्रमांक-२०१३०२०७१५३९११५८२१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कि. शां. परब )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र : परिशिष्ट-अ,ब व क

प्रति,

(१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
(२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
(३) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
(४) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
(५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
(६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
(७) सचिव, महाराष्ट्र राज्य खो खो असोसिएशन (संचालनालयामार्फत),
(८) सचिव, विदर्भ खो खो असोसिएशन (संचालनालयामार्फत),
(९) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
(१०) आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(११) सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),
(१२) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी,
(१३) मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(१४) मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(१५) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक,
(१६) निवड नस्ती (क्रीयुसे-२).

## : प रि शि ष्ट-"अ" :

## शासन निर्णय क्रमांक-क्रीस्पर्धा-१००९/(प्र.क्र.६६/०९)/क्रीयुसे-२, दिनांक ७ फेब्रुवारी,२०१३ चे सहपत्र

## कै.भाई नेरुरकर चषक खो-खो क्रीडा स्पर्धा नियम,२०१३

नियम-१ :- शीर्षक :- या नियमांना कै.भाई नेरुरकर चषक खो-खो क्रीडा स्पर्धा नियम,२०१३ असे संबोधण्यात यावे.

नियम-२ :- उद्दिष्ट :- राज्यातील खो खो खेळाच्या खेळाडूंना राज्य स्पर्धेत खेळण्याची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी तसेच त्यांना व क्रीडाप्रेमी प्रेक्षकांना दर्जेदार खेळाडूंचे कौशल्य व खेळ पाहण्यास मिळावा असे या स्पर्धेचे उद्दिष्ट आहे.

नियम-३ :- स्पर्धेचे स्वरुप व निकष :- (अ) ही स्पर्धा दरवर्षी राज्य स्तरावर वरिष्ठ गट पुरुष व महिलांसाठी तसेच १४ वर्षाखालील मुले व मुली या वयोगटामध्ये महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र खो खो असोसिएशन व विदर्भ खो खो असोसिएशन यांच्यामार्फत आयोजित करण्यात येईल,

(ब) स्पर्धेत सहभागी होणा-या वरिष्ठ गटातील खेळाडूस वयाची अट नाही. तथापि, १४ वर्षाखालील वयोगटासाठी संबंधित खेळाडूचे वय त्या त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी १४ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक राहील,

(क) वरिष्ठ गट (सिनियर) स्पर्धेमध्ये महाराष्ट्र खो खो संघटना, विदर्भ खो खो संघटना, कोल्हापूर खो खो संघटना यांनी त्या त्या वर्षी आयोजित केलेल्या राज्यस्तर अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेमध्ये सहभागी झालेले गुणवत्तेनुसार अनुक्रमे ८, ३ व १ असे एकूण पुरुष १२ व महिलांचे १२ संघ स्पर्धेत सहभागी होतील तर १४ वर्षाखालील वयोगटामध्ये गुणवत्तेनुसार अनुक्रमे ५, २ व १ असे एकूण मुले ८ व मुली ८ संघ सहभागी होतील. प्रत्येक संघात १२ खेळाडू, १ व्यवस्थापक व १ मार्गदर्शक अशा १४ सदस्यांचा समावेश राहील.

नियम-४ :- स्पर्धेच्या खर्चाचा तपशील :- या स्पर्धेच्या खर्चाचा तपशील सोबत जोडलेल्या परिशिष्ट-"ब" प्रमाणे राहील.

नियम-५ :- पुरस्काराचे स्वरुप :- (अ) या स्पर्धेतील वरिष्ठ गटातील व १४ वर्षाखालील वयोगटातील विजेत्या मुले व मुलींच्या संघास फिरता चषक देण्यात येईल. हा चषक कायमस्वरुपी फिरता असेल.

(ब) प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या संघातील खेळाडू, मार्गदर्शक व व्यवस्थापक यांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक देण्यात येईल.

(क) स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडू व अधिका-यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक विजयी संघातील खेळाडूंना प्राविण्य प्रमाणपत्र देण्यात येईल. सदर प्रमाणपत्रे जिल्हाधिकारी तथा आयोजन समितीचे कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खो खो संघटनेचे / विदर्भ खो खो संघटनेचे सचिव (आयोजन सचिव) विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा व संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देण्यात येतील.

**<u>नियम-६</u>** :- <u>स्पर्धेचा कालावधी तसेच सहभागी संघांना द्यावयाचा प्रवास व इतर खर्च</u> :- सदर स्पर्धेचे आयोजन दरवर्षी राज्यस्तरावर करण्यात येणार असल्याने स्पर्धेचा कालावधी हा ५ दिवसांचा राहील. (प्रत्यक्ष स्पर्धा चार दिवस तर स्पर्धेच्या अगोदर अर्धा दिवस व स्पर्धेनंतर अर्धा दिवस) तसेच निवास व भोजन व्यवस्था, वाहतूक व स्पर्धेच्या आयोजनावरील खर्च आयोजन समितीमार्फत करण्यात येईल. स्पर्धेत सहभागी होणा-या संघांना दुस-या वर्गाचे रेल्वे भाडे/ज्याठिकाणी रेल्वे उपलब्ध नसेल त्याठिकाणी जाण्यायेण्याचे निमआराम बसचे भाडे देण्यात येईल. तसेच स्थानिक वाहतूक व्यवस्था आयोजन समितीमार्फत पुरविण्यात येईल.

**<u>नियम-७</u>** :- <u>आहरण व संवितरण अधिकारी</u> :- या स्पर्धेसाठी आयुक्त/संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

**<u>नियम-८</u>** :- <u>आर्थिक मंजूरीचे अधिकार</u> :- या स्पर्धेच्या आयोजनासाठी शासनाने मंजूर केलेले अनुदान प्रथम विभागीय उपसंचालक यांच्या पीएलए खात्यामध्ये जमा करण्यात यावे. या स्पर्धेचे आयोजन विभागीय उपसंचालक यांचे कार्यालय असलेल्या जिल्ह्यामध्ये झाल्यास स्पर्धेसाठीचा खर्च विभागीय उपसंचालक यांच्या पीएलए खात्यामधून करण्यात यावा. या स्पर्धेचे आयोजन विभागीय उपसंचालक यांचे कार्यालय नसलेल्या जिल्ह्यामध्ये झाल्यास या स्पर्धेसाठी शासनाने मंजूर केलेले अनुदान आयोजन समितीकडे विभागीय उपसंचालक यांच्या पीएलए खात्यामधून आयोजन समितीच्या नावे बँकेत उघडण्यात आलेल्या खात्यामध्ये जमा करण्यात यावे. या स्पर्धेच्या आयोजनावरील खर्चाचा व्यवहार आयोजन समितीचे कार्याध्यक्ष यांच्या मान्यतेने करण्यात यावा. स्पर्धेचे व्यवहार कार्याध्यक्ष, आयोजन सचिव व संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा तथा कोषाध्यक्ष यांच्यापैकी दोघांच्या स्वाक्षरीने करण्यात यावा.

**<u>नियम-९</u>** :- <u>विनियोग प्रमाणपत्र</u> :- या स्पर्धा महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य खो खो संघटना / विदर्भ खो खो संघटना यांच्यामार्फत आयोजित करण्यात येत असल्याने परिशिष्ट-"ब" मध्ये दर्शविलेली रक्कम रु.५०.०० लाख परिशिष्ट-"क" मधील आयोजन समितीस अनुदान म्हणून देण्यात येईल. स्पर्धेचे आयोजन पूर्ण झाल्यानंतर आयोजन समितीने दोन महिन्याच्या आत मंजूर अनुदानाचा लेखा परीक्षण अहवाल, अनुदान विनियोग प्रमाणपत्र, स्पर्धेच्या खर्चाचा अहवाल व स्पर्धेचा सविस्तर अहवाल संचालनालयास सादर करणे आवश्यक राहील. अनुदानाची काही रक्कम शिल्लक राहिल्यास ती चलनाद्वारे शासनास परत करण्यात यावी.

**<u>नियम-१०</u>** :- <u>स्पर्धेसाठी संघांच्या सहभागाची जबाबदारी</u> :- या स्पर्धेमध्ये सिनिअर गट व १४ वर्षाखालील मुले व मुली यांचे संघ सहभागी होण्याबाबतची संपूर्ण जबाबदारी (नियम-३ (क) नुसार) महाराष्ट्र / विदर्भ / कोल्हापूर खो खो संघटनेची राहील.

**<u>नियम-११</u>** :- <u>स्पर्धेसाठी गठीत करावयाच्या समित्या</u> :- या स्पर्धेसाठीच्या विविध समित्या परिशिष्ट-"क" प्रमाणे राहतील.

**<u>नियम-१२</u>** :- <u>सर्वसाधारण</u> :-

(I) आयोजन समितीच्या पहिल्या बैठकीत स्पर्धेचे स्वरुप व अंदाजपत्रक मंजूर करुन घेण्यात येईल.

(II) या स्पर्धेसाठी ४ मैदाने तयार करण्यात येऊन १४ वर्षाखालील वयोगटासाठी दोन तर वरिष्ठ गटाच्या पुरुष व महिलांसाठी दोन मैदाने असतील.

(III) अनुदानाव्यतिरिक्त अधिक खर्च झाल्यास तो आयोजन समितीने करावा.

(IV) कै.भाई नेरुरकर चषक खो-खो क्रीडा स्पर्धा ज्या जिल्ह्यात होईल त्या जिल्ह्याचे व विभागाचे संबंधित अधिकारी समितीचे सदस्य असतील.

(V) कै.भाई नेरुरकर चषक खो-खो क्रीडा स्पर्धा ज्यावर्षी विदर्भात होईल त्यावर्षी महाराष्ट्र खो खो संघटनेऐवजी विदर्भ खो खो संघटना कार्यरत राहील.

(VI) आयोजन समितीस आवश्यक वाटल्यास उपयुक्त ठरणा-या अन्य व्यक्तींची सदस्य म्हणून नियुक्ती करता येईल. तसेच उपरोक्त नमूदकेलेल्या उपसमित्यांमध्ये वाढ करता येईल.

(VII) स्पर्धेसाठी नेमण्यात येणा-या तांत्रिक अधिका-यांचा प्रवास खर्च, निवास व भोजन खर्च, स्थानिक वाहतूक खर्च परिशिष्ट-"ब"मध्ये नमूद केल्यानुसार आयोजन समितीतर्फे करण्यात येईल. दैनंदिन कार्यालयीन कामासाठी आवश्यक तो कर्मचारीवर्ग आयोजन समितीस नियुक्त करता येईल.

(VIII) या स्पर्धेचे आयोजन शक्यतो प्रत्येक वर्षी जानेवारी महिन्यात करण्यात यावे. तत्पूर्वी संघटनांनी त्यांच्या राज्यस्तर वरिष्ठ गटाच्या (सिनिअर) व १४ वर्षाखालील वयोगटाच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन पूर्ण करावे.

(IX) संघटनेने आयोजित केलेल्या वरिष्ठ गट व १४ वर्षाखालील मुले/मुली क्रीडा स्पर्धेमध्ये ज्या जिल्ह्याच्या खेळाडूंनी राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत सहभाग घेतलेला आहे अशाच खेळाडूंना स्पर्धेत प्रवेश देण्यात यावा.

एखादा खेळाडू आजारी असल्यास, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धा व प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेला असल्यास व इतर अत्यंत महत्त्वाच्या कामामुळे त्या खेळाडूंऐवजी त्याच जिल्ह्यातील गुणानुक्रमे राखीव खेळाडूस प्रवेश देण्यात यावा.

(X) खर्चाच्या बाबींमधील रु.५०.०० लाखाच्या मर्यादेत बक्षिसाच्या रकमेव्यतिरिक्त उर्वरित रक्कम आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांच्या मान्यतेने इतर बाबींवर खर्च करता येईल.

(XI) कै.भाई नेरुरकर चषक खो-खो क्रीडा स्पर्धेचे आयोजन साखळी व बाद पध्दतीने करण्यात येईल.

(XII) निवास व्यवस्था व भोजन व्यवस्था, प्रेक्षक व्यवस्था, प्रसिध्दी व अन्य व्यवस्थापकीय बाबींची जबाबदारी संबंधित समित्यांची असेल.

<u>नियम-१३</u> :- <u>नियम शिथिल करणे / बदल करणे</u> :- या नियमावलीमधील कोणताही नियम शिथिल करणे त्यात अंशत: किंवा पूर्णत: बदल करणे, नवीन नियम समाविष्ट करणे याबाबतचे सर्व अधिकार शासनास राहतील.

-------

: परिशिष्ट-"ब" :

शासन निर्णय क्रमांक-क्रीस्पर्धा-१००९/(प्र.क्र.६६/०९)/क्रीयुसे-२, दिनांक ७ फेब्रुवारी,२०१३ चे सहपत्र

कै.भाई नेरुरकर चषक खो-खो क्रीडा स्पर्धेच्या बाबनिहाय खर्चाचा तपशील

| अ.क्र. | बाब | बाबनिहाय खर्च |
|---|---|---|
| १ | <u>सहभागी संघ</u> -<br>वरिष्ठ गट (सिनियर)-१२ पुरुष व १२ महिला संघ असे एकूण २४ संघ, १४ वर्षाखालील (किशोर/किशोरी) मुले-८ व मुली-८ संघ असे १६ संघ असे एकूण ४० संघ<br>प्रत्येक संघामध्ये १२ खेळाडू, १ क्रीडा मार्गदर्शक व १ व्यवस्थापक असा एकूण १४ जणांचा समावेश राहील. (४० X १४ = ५६०) | - |
| २ | सरपंच, पंच, अधिकारी व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांची संख्या अंदाजे ७० | - |
| ३ | स्पर्धेचा कालावधी एकूण ५ दिवस, ४ दिवस प्रत्यक्ष स्पर्धा, अर्धा दिवस स्पर्धेपूर्वी व अर्धा दिवस स्पर्धेनंतर | - |
| ४ | <u>प्रवास खर्च जाणे-येणे</u> :- खेळाडू, व्यवस्थापक, मार्गदर्शक, पंच, अधिकारी, संघटना पदाधिकारी, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना अंदाजे रु.५००/- प्रमाणे दुस-या वर्गाचे रेल्वे भाडे / ज्याठिकाणी रेल्वे उपलब्ध नसेल त्याठिकाणी जाण्यायेण्याचे निमआराम बसचे भाडे, शासकीय अधिकारी यांना शासन नियमाप्रमाणे (५०० X ६३०) | रु.३,१५,००० |
| ५ | खेळाडू, व्यवस्थापक, मार्गदर्शक, पंच, अधिकारी, संघटना पदाधिकारी, शासकीय अधिकारी यांचा भोजन खर्च दरदिवशी प्रत्येकी रु.२५०/- प्रमाणे ५ दिवस (२५० X ६३० X ५) | रु.७,८७,५०० |
| ६ | खेळाडू, व्यवस्थापक, मार्गदर्शक, पंच, अधिकारी, संघटना पदाधिकारी, शासकीय अधिकारी यांचा निवास खर्च रु.१५०/- प्रमाणे ५ दिवस (१५० X ६३० X ५) | रु.४,७२,५०० |
| ७ | <u>कै.भाई नेरुरकर मुख्य फिरता चषक</u><br>१ पुरुष व १ महिला तसेच १४ वर्षाखालील १ मुले व १ मुली | रु.३,००,००० |
| ८ | खेळाडू, मार्गदर्शक, व्यवस्थापक यांना पदक (मेडल) प्रति सेट रु.९००/- प्रमाणे (९०० X ५६)<br>(मेडल साईज २.२५ ते २.५० इंच, डाय डमबॉसिंगसह) | रु.५०,४०० |

| | | |
|---|---|---|
| ९ | **<u>रोख्र बक्षिसे</u>**<br>(अ) सिनियर विजयी संघातील खेळाडू, मुले/मुली, व्यवस्थापक, मार्गदर्शक यांना प्रत्येकी रु.१५,०००/- प्रमाणे<br>(२८ X रु.१५,०००/- प्रमाणे) | रु.४,२०,००० |
| | (ब) सिनियर उपविजयी संघातील खेळाडू, मुले/मुली, व्यवस्थापक, मार्गदर्शक यांना प्रत्येकी रु.१०,०००/- प्रमाणे<br>(२८ X रु.१०,०००/- प्रमाणे) | रु.२,८०,००० |
| | (क) सिनियर तृतीय क्रमांक संघातील खेळाडू, मुले/मुली, व्यवस्थापक, मार्गदर्शक यांना प्रत्येकी रु.७,०००/- प्रमाणे<br>(२८ X रु.७,०००/- प्रमाणे) | रु.१,९६,००० |
| | (ड) सिनियर चतुर्थ क्रमांक संघातील खेळाडू, मुले/मुली, व्यवस्थापक, मार्गदर्शक यांना प्रत्येकी रु.५,०००/- प्रमाणे<br>(२८ X रु.५,०००/- प्रमाणे) | रु.१,४०,००० |
| | (इ) सिनियर पाचवा क्रमांक संघातील खेळाडू, मुले/मुली, व्यवस्थापक, मार्गदर्शक यांना प्रत्येकी रु.३,०००/- प्रमाणे<br>(२८ X रु.३,०००/- प्रमाणे) | रु.८४,००० |
| | (फ) सिनियर सहावा क्रमांक संघातील खेळाडू, मुले/मुली, व्यवस्थापक, मार्गदर्शक यांना प्रत्येकी रु.२,०००/- प्रमाणे<br>(२८ X रु.२,०००/- प्रमाणे) | रु.५६,००० |
| | (ग) किशोर / किशोर विजयी संघातील खेळाडू, मुले/मुली, व्यवस्थापक, मार्गदर्शक यांना प्रत्येकी रु.८,०००/- प्रमाणे<br>(२८ X रु.८,०००/- प्रमाणे) | रु.२,२४,००० |
| | (ह) किशोर / किशोर उपविजयी संघातील खेळाडू, मुले/मुली, व्यवस्थापक, मार्गदर्शक यांना प्रत्येकी रु.६,०००/- प्रमाणे<br>(२८ X रु.६,०००/- प्रमाणे) | रु.१,६८,००० |
| | (ई) किशोर / किशोर तृतीय क्रमांक संघातील खेळाडू, मुले/मुली, व्यवस्थापक, मार्गदर्शक यांना प्रत्येकी रु.४,०००/- प्रमाणे<br>(२८ X रु.४,०००/- प्रमाणे) | रु.१,१२,००० |
| | (ज) किशोर / किशोर चतुर्थ क्रमांक संघातील खेळाडू, मुले/मुली, व्यवस्थापक, मार्गदर्शक यांना प्रत्येकी रु.२,०००/- प्रमाणे<br>(२८ X रु.२,०००/- प्रमाणे) | रु.५६,००० |

| | | |
|---|---|---|
| | (ल) सिनियर सर्वोत्कृष्ट अष्टपैलू १ पुरुष व १ महिला खेळाडू यांना प्रत्येकी रु.१५,०००/- प्रमाणे (२ X रु.१५,०००/- प्रमाणे) | रु.३०,००० |
| | (म) सिनियर सर्वोत्कृष्ट संरक्षक १ पुरुष व १ महिला खेळाडू यांना प्रत्येकी रु.१०,०००/- प्रमाणे (२ X रु.१०,०००/- प्रमाणे) | रु.२०,००० |
| | (न) सिनियर सर्वोत्कृष्ट आक्रमक १ पुरुष व १ महिला खेळाडू यांना प्रत्येकी रु.१०,०००/- प्रमाणे (२ X रु.१०,०००/- प्रमाणे) | रु.२०,००० |
| | (प) सर्वोत्कृष्ट अष्टपैलू १ किशोर व १ किशोरी खेळाडू यांना प्रत्येकी रु.१०,०००/- प्रमाणे (२ X रु.१०,०००/- प्रमाणे) | रु.२०,००० |
| | (र) सिनियर सर्वोत्कृष्ट संरक्षक १ किशोर व १ किशोरी खेळाडू यांना प्रत्येकी रु.७,०००/- प्रमाणे (२ X रु.७,०००/- प्रमाणे) | रु.१४,००० |
| | (स) सर्वोत्कृष्ट अष्टपैलू १ किशोर व १ किशोरी खेळाडू यांना प्रत्येकी रु.७,०००/- प्रमाणे (२ X रु.७,०००/- प्रमाणे) | रु.१४,००० |
| | एकूण रोख बक्षिसे | रु.१८,५४,००० |
| १० | सरपंच, पंच, सामना अधिकारी, संघटना प्रतिनिधी व शासकीय अधिकारी एकूण ७० यांना मानधन रु.५००/- प्रमाणे ५ दिवस (७० X ५०० X ५) | रु.१,७५,००० |
| ११ | क्रीडांगण तयार करणे व देखभाल खर्च (माती, पाणी, रोलर, चुना, पोल व इतर) | रु.१,००,००० |
| १२ | मैदानासाठी व स्पर्धेच्या कामासाठी २५ स्वयंसेवकांचे मानधन रु.२५०/- प्रमाणे ६ दिवस (२५० X २५ X ६) | रु.३७,५०० |
| १३ | प्रेक्षक गॅलरी, क्रीडांगणावरील प्रकाश झोतासाठी व्यवस्था, विद्युत व्यवस्था, शामियाने, व्हीआयपी आसन व्यवस्था, निमंत्रितांची आसन व्यवस्था, स्टेज व इतर अनुषंगिक बाबींचा खर्च | रु.४,००,००० |
| १४ | <u>सादिल खर्च</u> :- उद्घाटन व समारोप, रोषणाई, प्रसिध्दी, बॅनर्स, साऊंड सिस्टीम, व्हिडीओ रेकॉर्डिंग व फोटो छपाई, झेरॉक्स, प्रमाणपत्र छपाई, आवश्यक क्रीडा साहित्य, स्टेशनरी, संगणक/फॅक्स, टेलिफोन, वाहतूक खर्च व स्पर्धेच्या अनुषंगाने होणारा इतर खर्च इत्यादी | रु.५,०८,१०० |
| | | |
| | एकूण : | रु.५०,००,००० |

<u>टीप</u> :- वरील बाब क्रमांक-७ मधील रु.३,००,०००/- एवढी रक्कम सन २०१३-१४ या वर्षापासून सादिल खर्चामध्ये रु.१,५०,०००/- व बाब क्रमांक-१३ वरील प्रेक्षक गॅलरी व अन्य बाबींसाठी रु.१,५०,०००/- याप्रमाणे वर्ग करण्यात यावी.

## : प रि शि ष्ट-"क" :

**शासन निर्णय क्रमांक-क्रीस्पर्धा-१००९/(प्र.क्र.६६/०९)/क्रीयुसे-२, दिनांक ७ फेब्रुवारी,२०१३ चे सहपत्र**

**कै.भाई नेरुरकर चषक खो-खो क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासंबंधात गठीत करावयाच्या विविध समित्या**

**कै.भाई नेरुरकर चषक खो-खो क्रीडा स्पर्धेचे आयोजन यशस्वी होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे विविध समित्या गठीत करण्यात याव्यात :-**

(अ) **उच्चस्तरीय समिती (High Power Committee)**

सदर स्पर्धेचे सर्वसाधारण धोरण व संनियंत्रण करणे, स्पर्धेचे ठिकाण ठरविणे आणि स्पर्धेसाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे उच्चस्तरीय समिती नेमण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| १ | मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) | अध्यक्ष |
| २ | राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) | उपाध्यक्ष |
| ३ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव (वित्त) | सदस्य |
| ५ | सचिव / प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य / विदर्भ राज्य खो खो असोसिएशन | सदस्य |
| ६ | आयुक्त / संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे | सदस्य सचिव |

(ब) **आयोजन समिती**

स्पर्धेचे आयोजन यशस्वी होण्याच्या दृष्टीने स्पर्धेच्या आयोजनासंदर्भात पूर्वतयारीसाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्ह्याचे पालक मंत्री | अध्यक्ष |
| २ | संबंधित जिल्ह्याचे जिल्हा परिषद अध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ३ | स्थानिक आमदार | उपाध्यक्ष |
| ४ | शहराचे महापौर / नगराध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ५ | जिल्हाधिकारी | कार्याध्यक्ष |
| ६ | महाराष्ट्र राज्य / विदर्भ राज्य खो खो असोसिएशनचे सचिव | आयोजन सचिव |
| ७ | उपसंचालक (क्रीडा व युवकसेवा) | कोषाध्यक्ष |
| ८ | संबंधित जिल्हा खो खो संघटनेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी | संयुक्त सचिव |
| १० | महापालिका आयुक्तांचे / मुख्याधिकारी, नगरपालिका यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | पोलीस आयुक्तांचे / पोलीस अधीक्षकांचे प्रतिनिधी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १२ | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| १३ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| १४ | महाविद्यालयाचे प्राचार्य (दोन) | सदस्य |
| १५ | जिल्हा क्रीडा परिषदेचे सदस्य (दोन) | सदस्य |
| १६ | जिल्हा परिषद सदस्य / नगरसेवक (दोन) | सदस्य |
| १७ | आकाशवाणी / दूरदर्शन प्रतिनिधी | सदस्य |

आवश्यकतेनुसार या समितीमध्ये विशेष निमंत्रक म्हणून सभासद घेण्याचा अधिकार अध्यक्षांना व कार्याध्यक्षांना राहील.

<u>उपसमित्या</u> :-

याशिवाय स्पर्धा यशस्वीरितीने पार पाडण्यासाठी आयोजन समितीच्या अधिपत्याखाली खालील उप समित्या नेमण्यात याव्यात :-

(१) तांत्रिक समिती (क्रीडांगण व सामने)
(२) निवास व्यवस्था समिती
(३) भोजन व्यवस्था समिती
(४) प्रसिध्दी व स्मरणिका समिती
(५) वाहतूक व्यवस्था समिती
(६) स्वयंसेवक समिती
(७) उद्घाटन / समारोप समारंभ समिती
(८) वैद्यकीय सेवा समिती

आयोजन समिती उपयुक्त ठरणा-या व्यक्तींची वरील उपसमित्यांमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती करेल. तसेच आयोजन समितीस आवश्यकतेनुसार वरील उपसमित्यांमध्ये वाढ करता येईल.

--------

दि. ०१/०३/२०१३

क्रिडा व युवक सेवा संचालनालय
म.रा. पुणे-१
1 MAR 2013
आवक क्र. 2684
आवक लिपीक

प्रति,
मा. आयुक्त,
क्रीडा व युवक सेवा, संचालनसलय.
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :- शारीरिक शिक्षण महाविद्यालयांचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतनाबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, शारीरिक शिक्षण महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे माहे जानेवारी २०१३ पर्यंतचे वेतन प्राप्त झालेले आहे. सद्यस्थितीत वेतनाबाबतची तक्रार आता राहिलेली नाही. कृपया यापुढील वेतन वेळेवर मिळावे अशी विनंती आहे.

आपले विश्वासू

1 Dr N. Nimkar — C. Agashe College — [signature]
2 DR. G.V. PARGAONKAR — B.P.C.A. College Mumbai — [signature] 01-03-13
3 Dr. D.P. Kavishwar — N.S.S.M. Nagpur — [signature]
4 Dr A.P. Kamrandi — FOLPE Nagpur — [signature] 1/3/13
5 Dr. R.M. Kshirsagar — B.P.Ed. Coll. Yavatmal. — [signature]
6. Dr. S. C. Sharma — A.C.P.E Amravati — [signature]
7 R. M. Kadu — Shri Shivaji Coll. of Phy Edu. Amt — [signature]
8. Dube P.B. — A'bad. — [signature]

J.D
Annex with our reply.
[signature]
01/03